**सं.फौ.ख.क्र. ७९/२०१८**
**महाराष्ट्र शासन .वि. महादेव**
**निशाणी क्रमांक : २४**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

*मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,*

**माझे नाव — अमोल रामकृष्ण पद्मणे**

**वय — ३५** वर्ष **व्यवसाय — वाहणचालक**

**राहणार —** रा. आलेगांव ता. पातूर जि. अकोला.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे श्री टि.एस.सिरसाट यांचे मार्फत शपथेवर सुरू—</u>**

**१.** मी फिर्यादी नामे मिरा डिगांबर ढोणे यांना ओळखतो. तसेच मी आरोपी महादेव यांना देखील ओळखतो. घटणा दिनांक १५–१०–२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास घडली होती. घटणेच्यावेळी मी मिराबाई ढोणे यांच्या शेतात मळणी यंत्र घेवून गेलो होतो. मी मिराबाई ढोणे यांच्या शेतातील पिकाचे मळणी यत्रावरील काम पूर्ण करूण परत येत असतांना आरोपी यांनी मला अडविले व सांगितले की माझया शेतातून रस्ता नाही तुम्ही तुमचा टॅक्टर व मळणी यंत्र माझया शेतातून घेवून जायचे नाही. त्यानंतर मी माझा टॅक्टर व मळणी यंत्र त्याच जागेवर उभे केले व त्यानंतर मी घरी निघुन गेलो. त्यानंतर घटणास्थळावर काय घडले हे मला माहिती नाही. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ ए.एस.काझी यांचे मार्फत शपथेवर सुरू.</u>**

**०२.** माझे शिक्षण १० वी पर्यन्त झाले आहे. मी टॅक्टर चालविण्याचा परवाना कधी घेतला याची निश्चित तारीख मला आठवत नाही तसेच सदर परवाना कोणत्या मुदतीपर्यन्त वैध आहे याची तारीख मला आठवत नाही. मी पोलीसांना बयाण देते वेळी टॅक्टरचा नंबर सांगितला नव्हता. हे मला माहिती आहे की, टॅक्टरला नोंदणी क्रमांक मिळे पावेतो टॅक्टर चालविला येत नाही. मी पोलीसांना बयाण देते वेळी असे सांगितले होते की, मी मिराबाई ढोणे यांच्या शेतात मळणी यंत्र घेवून गेलो होतो. मी मिराबाई ढोणे यांच्या शेतातील पिकाचे मळणी यत्रावरील काम पूर्ण करूण परत येत असतांना आरोपी यांनी मला अडविले व सांगितले की माझया शेतातून रस्ता नाही तुम्ही तुमचा टॅक्टर व मळणी यंत्र माझया शेतातून घेवून जायचे नाही ही बाब पोलीसांना सांगितली होती. हे मी सांगू शकत नाही की, सदर बाब पोलीसांनी माझया बयाणात का लिहीली नाही. हे खरे आहे की, आरोपीचे आलेगांव येथे मेडीकल स्टोअर आहे व त्यामुळे त्यांना गावातील सर्व लोक ओळखतात. हे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटणा घडली नव्हती. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**
**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्विकृत,

( एस. बी. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पातूर

दिनांक — ०६/०३/२०२६